दि. ५ /१०/२०२१.


# अलिबागच्या कांद्याला जीआय मानांकन

## पेटंट कार्यालयाकडून स्वीकृती; जागतिक बाजारपेठेत स्थान

लोकमत न्यूज नेटवर्क

अलिबाग : गेल्या अनेक वर्षांपासून लागवडीची परंपरा जोपासलेल्या अलिबागच्या गोड, पांढऱ्या कांद्याला भौगोलिक निर्देशांक (जीआय) देण्याबाबत केंद्र सरकारच्या पेटंट कार्यालयाकडून स्वीकृती देण्यात आली आहे. यामुळे शेतकऱ्यांचा उत्साह वाढला असून, अलिबाग तालुक्यातील कांद्याला आता देशासह जागतिक बाजारपेठेत स्थान मिळवणे शक्य होणार आहे.

महाराष्ट्रात होणाऱ्या कांद्यांच्या विविध प्रकारांपैकी अलिबागच्या पांढऱ्या कांद्याने आपले वेगळे वैशिष्ट्य जपले आहे. मोत्यासारखा पांढरा शुभ्र, मोदकासारखा आकर्षक आकार, गोड चवीचा व विविध औषधी गुणधर्मांनी युक्त म्हणून या कांद्याची ओळख आहे.



शेतकऱ्यांनी मोठ्या कष्टाने पांढरा कांदा आजपर्यंत जोपासला आहे. जीआय स्वीकृती मिळाल्याने आनंद तर झालाच, शिवाय हुरूपही वाढला आहे. अधिकाधिक ग्राहकांपर्यंत या कांद्याचा प्रसार झाल्यास मागणी वाढून दरही चांगले मिळतील.

- सचिन पाटील, अध्यक्ष, पांढरा कांदा उत्पादक संघ, अलिबाग

### ऐतिहासिक दाखले

बॉम्बे प्रेसिडेन्सी- कुलाबा गॅझेटच्या १८८३ च्या मूळ प्रतीत व २००६ च्या ई बुक आवृत्तीत अलिबागमध्ये पांढरा कांदा लागवडीखाली असल्याचे ऐतिहासिक दाखले देण्यात आले आहेत. वाडवडिलांच्या आधीपासून येथील शेतकऱ्यांनी त्याचे शुद्ध बियाणे संवर्धित केले आहे. सात-आठ गावे पांढऱ्या कांद्याच्या लागवडीसाठी प्रसिद्ध असून, उत्पादकांची संख्या सहाशेहून अधिक आहे.

दै. "सामना" दि. ८/१०/२०२१.

# 'बाजार समितीच्या गेटवर सेस वसुलीबाबत अभ्यास करण्यासाठी समिती स्थापन'

पुणे, दि. ७ (प्रतिनिधी – पुणे कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये सेसची वसुली थेट खरेदीदारांकडून गेटवर होण्यासाठी विविध व्यापारी असोसिएशनकडून मागणी करण्यात आली आहे. त्यामुळे याबाबत अभ्यास करण्यासाठी कृषी पणन मंडळाचे कार्यकारी संचालक सुनील पवार यांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन करून अहवाल प्राप्त झाल्यानंतर पुढील निर्णय घेण्यात येईल, असे आश्वासन सहकार व पणनमंत्री बाळासाहेब पाटील यांनी दिले.

तळेगाव दाभाडे येथील राष्ट्रीय सुगी पश्चात तंत्रज्ञान संस्थेत झालेल्या बैठकीत ते बोलत होते. यावेळी मुंबई कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक संजय देशमुख, सचिव संदीप देशमुख, पणन संचालनालयाचे सहसंचालक विनायक कोकरे, पुणे कृषी उत्पन्न बाजार समितीचे प्रशासक मधुकांत गरड आदी उपस्थित होते.

बाळासाहेब पाटील म्हणाले, शेतकरी व ग्राहकांचे हित लक्षात घेता कृषी उत्पन्न बाजार समितीचे अस्तित्व टिकले पाहिजे. समितीच्या कामकाजात गैरव्यवहार आणि कामगारांची व शेतकऱ्यांची पिळवणूक होता कामा नये. आवारात अतिक्रमण होणार नाही, याबाबत दक्षता घेण्यात यावी. आपत्कालीन परिस्थितीत रुग्णवाहिका फिरताना कुठल्याही प्रकारची अडचण होता कामा नये, अशा सूचना त्यांनी दिल्या.


उपस्थित पदाधिकाऱ्यांनी या निर्णयाचे स्वागत केले. यावेळी आडते असोसिएशन आणि पूना मर्चंट असोसिएशनचे पदाधिकारी उपस्थित होते.

दै. "अॅग्रोवन" दि. ९/१०/२०२१

# बाजार समिती सेस प्रवेशद्वारावर वसुलीबाबत समिती

## पणनमंत्री बाळासाहेब पाटील यांची माहिती

**अॅग्रोवन वृत्तसेवा**



पुणे : गुलटेकडी येथील कृषी उत्पन्न बाजार समिती सह राज्यातील विविध बाजार समित्यांमधील सेसची (बाजार शुल्क) वसुली खरेदीदारांकडून रोज प्रवेशद्वारावरच वसूल करण्याबाबत अभ्यास समिती स्थापन करण्यात येईल. समितीच्या अहवालानंतर निर्णय घेतला जाईल, असे आश्वासन पणन मंत्री बाळासाहेब पाटील यांनी दिली.

पुणे बाजार समितीमधील आडते असोसिएशन आणि पूना मर्चटस चेंबर ने सेस प्रवेशद्वारावर वसूल करण्याची मागणी केली होती. या मागणी बाबत मंत्री पाटील यांनी तळेगाव दाभाडे येथील राष्ट्रीय सुगी पश्चात तंत्रज्ञान संस्थेत बैठकीचे आयोजन केले होते. बैठकीला पणन मंडळाचे कार्यकारी संचालक सुनील पवार, पणन सहसंचालक विनायक कोकरे, मुबंई कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक संजय पानसरे, सचिव संदीप देशमुख, पुणे कृषी उत्पन्न बाजार समितीचे प्रशासक मधुकांत गरड, आडते असोसिएशनचे अध्यक्ष विलास भुजबळ, मर्चटस चेंबरचे वालचंद संचेती आदी उपस्थित होते.

या बाबत बोलताना मंत्री पाटील म्हणाले, "बाजार समितीमधील खरेदीदारांकडून प्रवेशद्वारावर सेसच्या वसुलीची मागणी विविध व्यापारी असोसिएशन कडून मागणी करण्यात आली आहे. गेटवर सेस वसुलीबाबत अभ्यास करण्यासाठी महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळाचे कार्यकारी संचालक सुनील पवार यांच्या अध्यक्षतेखाली समितीची स्थापन करून अहवाल प्राप्त झाल्यानंतर पुढील निर्णय घेण्यात येईल. शेतकरी व ग्राहकांचे हीत लक्षात घेता कृषी उत्पन्न बाजार समितीचे अस्तित्व टिकले पाहिजे. बाजार समितीच्या कामकाजात गैरव्यवहार आणि कामगारांची व शेतकऱ्यांची पिळवणूक कोणत्याही परिस्थितीत होता कामा नये. कृषी उत्पन्न बाजार समितीच्या आवारात अतिक्रमण होणार नाही या बाबत दक्षता घेण्यात यावी."

दै. "ॲग्रोवन" दि. ११।१०।२०२१.

# गूळ सौदे नियमित होणार

## बॉक्सचे वजन सौद्यात धरण्याचा तोडगा

**ॲग्रोवन वृत्तसेवा**



कोल्हापूर : गुळाच्या बॉक्सचे वजन धरण्याचा तोडगा निघाल्या नंतर सौदे निघण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. बाजार समितीत या हंगामातील गूळ येण्यास हळूहळू प्रारंभ झाला आहे.

पूर्ण क्षमतेने हंगाम सुरू होण्याआधीच कोणत्या तरी कारणावरून सौदे बंद करण्याचा दरवर्षीची परंपरा यंदाही कायम राहिली आहे. सध्या एक दोन दिवस आड केवळ दोन ते तीन हजार गूळ रव्याची आवक होत आहे. पण यातही अडचण निर्माण झाली आहे. सौदे झाल्यानंतर गूळ रव्याच्या बॉक्सचे वजन गृहीत धरले जात नसल्याच्या कारणावरून गूळ उत्पादक व्यापाऱ्यांत दोन दिवसांपासून संघर्ष सुरू झाला.

शनिवारी (ता. ९) दुपारी गूळ उत्पादक शेतकऱ्यांनी रव्यांच्या बॉक्ससह जिल्हाधिकारी कार्यालयात धाव घेतली. पुन्हा शेतकरी बाजार समितीत आले. बैठक झाली. यात बॉक्सचे वजन सौद्यात धरण्याचा तोडगा निघाला. त्यानुसार सोमवारपासून सौदे सुरू करण्याचा निर्णय झाला. शाहू मार्केट यार्डात शेतकरी गूळ घेऊन येतात, तो सौद्याला लावल्यानंतर गुळाच्या बॉक्सचे वजन केले जाते. यातील फक्त गुळाचे वजन धरून गुळाचे पैसे दिले जातात, मात्र बॉक्सचे वजन धरले जात नसल्याने पैसे मिळत नाहीत. यात शेतकऱ्यांचे नुकसान होते. त्यामुळे बॉक्सचे वजनगृहीत धरून त्याचेही पैसे द्यावेत, अशी शेतकऱ्यांची मागणी आहे. मात्र, त्याला व्यापाऱ्यांना विरोध केला यावरून दोन दिवस व्यापारी व गूळ उत्पादक शेतकरी यांच्यात वाद सुरू आहे. या बाजार समितीने गुळाच्या बॉक्सचे वजन धरले जावे, अशा सूचना व्यापाऱ्यांना दिल्या होत्या. त्यानुसार शनिवारपासून सौदे होणार होते. सकाळी अनेक शेतकरी रवे घेऊन बाजारपेठेत आले. मात्र. व्यापारी सौद्यासाठी आले नाहीत. गुळाची खरेदी होऊ शकली नाही. माल पडून राहातोय हे दिसताच शेतकरी संतप्त झाले त्यांनी गुळाच्या गाड्या घेऊन जिल्हाधिकारी कार्यालयात गाठले.

जिल्हाधिकारी कार्यालयाकडून याची माहिती जिल्हा सहकार निबंधकांना दिली. सहकार निबंधक अमर शिंदे यांच्या उपस्थितीत बाजार समितीत शेतकरी, व्यापारी प्रतिनिधीची बैठक झाली. तिथे बॉक्सचे वजन सौद्यात धरावे, त्याचे पैसे द्यावे असे ठरले. यावेळी मंडळ सदस्य प्रा. जालंदर पाटील, नामदेव पाटील, मानसिंग पाटील व सचिव जयवंत पाटील, व्यापारी प्रतिनिधी नीलेश पटेल, गूळ उत्पादक विष्णू पाटील, सुरेश पाटील आदी उपस्थित होते.

दै. "ॲग्रोवन" दि. ११।१०।२०२१.

# 'एनआयपीएचटी'मध्ये होणार बांबू प्रशिक्षण केंद्र

## पणनमंत्री बाळासाहेब पाटील यांची माहिती

ॲग्रोवन वृत्तसेवा

पुणे : राज्य कृषी पणन मंडळ संचलित राष्ट्रीय सुगीपश्चात तंत्रज्ञान संस्थेत (एनआयपीएचटी) बांबू मूल्यवर्धन आणि प्रशिक्षण केंद्र लवकरच सुरू करण्यात येईल, अशी माहिती पणनमंत्री बाळासाहेब पाटील यांनी दिली. मंत्री पाटील यांच्या हस्ते तंत्रज्ञान संस्थेच्या नूतनीकरण करण्यात आलेल्या प्रशासकीय इमारतीचे उद्घाटन करण्यात आले. या वेळी त्यांनी माहिती दिली.

पणन मंडळाचे कार्यकारी संचालक सुनील पवार, संस्थेचे संचालक डॉ. भास्कर पाटील आदी उपस्थित होते. एनआयपीएचटीमध्ये सध्या पॉलिहाउसमधील भाजीपाला आणि पुष्पोत्पादनाचे प्रशिक्षण दिले जात आहे. या प्रशिक्षणाबरोबरच आता नागपूरच्या महाराष्ट्र बांबू विकास मंडळाच्या सहकार्याने संस्थेच्या बांबू सामान्य सुविधा आणि मूल्यवर्धन केंद्राची स्थापना करण्यात आली आहे.

बांबूला हिरवं सोन म्हटलं जातं आणि बांबूपासून इथेनॉल उत्पादनाचे प्रयोगदेखील सुरू आहेत. मावळ मुळशी परिसरात बांबूची मोठी लागवड असून, या उत्पादनावर प्रक्रिया आणि मूल्यवर्धनातून रोजगार निर्मितीसाठी प्रशिक्षण केंद्र सुरू केले जाईल, असे पाटील यांनी या वेळी सांगितले.



तळेगाव दाभाडे, जि. पुणे : राष्ट्रीय सुगीपश्चात तंत्रज्ञान संस्थेच्या नूतनीकरण केलेल्या आणि बांबू मूल्यवर्धन केंद्रांचे उद्घाटन पणनमंत्री बाळासाहेब पाटील यांच्या हस्ते करण्यात आले.

दै. "सकाळ" दि. १३।१०।२०२१. (नाशिक आवृत्ती)

# मानांकन नोंदणीत राज्याचा ९१ टक्के सहभाग

## आंबा अन् डाळिंब उत्पादक आघाडीवर

**सकाळ वृत्तसेवा**

नाशिक, ता. १३ : निर्यातीला चालना देण्यासाठी राज्यातील वैशिष्ट्यपूर्ण गुणधर्म असलेल्या फळे व भाजीपाल्याची निवड करून राष्ट्रीय कृषी विकास योजनेंतर्गत भौगोलिक मानांकनाचा दर्जा प्राप्त करण्यासाठी कृषी विभागाने पुढाकार घेतला आहे. त्याअंतर्गत चेन्नईच्या भौगोलिक मानांकन नोंदणी कार्यालयाकडून राज्यातील २० फळे व भाजीपाल्यासाठी भौगोलिक मानांकन दर्जा प्राप्त झाला आहे. देशातील ९० पिकांसाठी तीन हजार शेतकऱ्यांनी नोंदणी केली आहे. त्यात राज्यातील ९१ टक्के म्हणजेच, दोन हजार ७३५ शेतकऱ्यांचा समावेश आहे.

भौगोलिक मानांकनाचा अधिकृत वापर करण्यासाठी मान्यता मिळालेल्या राज्यातील शेतकऱ्यांची पीकनिहाय संख्या अशी : कोकण हापूस आंबा-९५३, सोलापूरचे डाळिंब-८४६, सांगलीचा बेदाणा-१८६, आजराची घनसाळ-११८, वेंगुर्लाचा काजू-११८, जळगावच्या केळी-१९२, वाघ्या घेवडा-८९, घोळवडचा चिकू- ७६, नवापूरची तूरडाळ- ६१, कोकम- ३८, मंगळवेढ्याची ज्वारी- २५, वायगावची हळद- २०, जळगावचे भरीत वांगे-१. भौगोलिक मानांकन प्राप्त पिकांची 'जीआय' ब्रॅन्डिंगद्वारे 'मार्केटिंग' आणि निर्यात करता येते. कृषी आयुक्त आणि फलोत्पादन संचालकांनी जानेवारी ते मार्च २०२१ मध्ये खास मोहीम राबविण्यात आली. कृषी विभाग आणि राज्य पणन मंडळ, डाळिंब उत्पादक संघातर्फे शेतकऱ्यांच्या कार्यशाळा घेण्यात आल्या.

चेन्नईच्या भौगोलिक मानांकन नोंदणी कार्यालयाकडे जूनमध्ये १०० अर्ज पाठवण्यात आले होते. त्यानंतर २०० अर्ज पाठवले. आणखी एक हजार अर्ज पाठवण्याच्या प्रक्रियेत आहेत. पहिल्यांदा पाठवण्यात आलेल्या शंभर अर्जांची छाननी करून नोंदणी कार्यालयाने या अर्जाच्या सर्व डाळिंब उत्पादकांना नोंदणी दिली आहे. राज्यातील शेतकऱ्यांना दहा रुपयांमध्ये नोंदणी प्रमाणपत्र देण्यात येते.

### 'जीआय' उत्सव

'जीआय' मानांकित पिकांसाठी 'जीआय उत्सव' घेऊन ग्राहकांना एकाच ठिकाणी विविध मानांकित उत्पादनांसाठी 'विकेल ते पिकेल' या योजनेंतर्गत कृषी विभाग, पणन मंडळ आणि आत्मा विभागातर्फे खास मोहीम राबवण्यात येणार आहे. त्याचा फायदा शेतकऱ्यांसोबत ग्राहकांना होणार आहे. भौगोलिक मानांकन आणि अधिकृत वापरासाठी पुणे, नाशिक, कोल्हापूर, खोपोली, औरंगाबाद, अमरावती आणि नागपूर येथे प्रादेशिक प्रशिक्षण संस्थेतर्फे प्रशिक्षण घेण्यात आले. सांगलीच्या जिल्हा कृषी अधीक्षक कृषी अधिकाऱ्यांनी सांगली बेदाणा आणि सांगली हळद, तर ठाण्याच्या जिल्हा कृषी अधिकाऱ्यांना कोकण हापूस व चिकूसाठी कार्यशाळा घेतली होती. फलोत्पादन संचालक डॉ. कैलास मोते यांनी ही माहिती दिली

दै. "ॲग्रोवन" दि. १५/१०/२०२१.

# भौगोलिक मानांकनात महाराष्ट्राची आघाडी

## नोंदणी मोहीम आता राज्यभर राबविण्यात येणार

**ॲग्रोवन वृत्तसेवा**

पुणे : देशातील भौगोलिक मानांकनाच्या एकूण नोंदणीकृत शेतकऱ्यांपैकी आपल्या राज्यात ९१ टक्के उत्पादक तयार झालेले आहेत. ही आघाडी कायम ठेवण्यासाठी नोंदणी मोहीम आता राज्यभर राबविण्यात येणार आहे, अशी माहिती फलोत्पादन संचालक डॉ. कैलास मोते यांनी दिली.

राज्यातून मोठ्या प्रमाणात फळे व भाजीपाला निर्यात होते आहे. निर्यातीला चालना देण्यासाठी वैशिष्ट्यपूर्ण गुणधर्म असलेल्या पिकांना भौगोलिक मानांकनाचा दर्जा दिला जात आहे. त्यासाठी राष्ट्रीय कृषी विकास योजनेची मदत घेतली जाते. चेन्नईतील नोंदणी कार्यालयाशी पत्रव्यवहार केला जातो.

पान ४ वर »

# भौगोलिक मानांकनात महाराष्ट्राची आघाडी

» पान १ वरून

यामुळे २० फळे व भाजीपाला पिकांना भौगोलिक मानांकन मिळाले आहे. यात द्राक्ष, डाळिंब, आंबा, केळी, संत्रा, मोसंबी, चिपको, अंजीर, सीताफळ, कांदा, काजू, कोकम, भरीत वांगे, सांगली हळद, बेदाणा, वायगाव हळदीचा समावेश आहे.

मानांकन मिळाल्यानंतर मानांकित पिकाच्या कार्यक्षेत्रात कोणालाही मानांकनाचा वापर करता येत नाही. त्यासाठी आधी या शेतकऱ्यांला अधिकृत वापर करता म्हणून मानांकन कार्यालयात नोंदणी करावी लागते. आयुक्तांच्या सूचनेनंतर चालू वर्षात जानेवारी ते मार्चमध्ये खास मोहीम राबविण्यात आली. डाळिंब उत्पादक शेतकऱ्यांसाठी कृषी विभाग, पणन मंडळ व डाळिंब उत्पादक संघाने कार्यशाळा घेतली. यामुळे नोंदणी अर्ज भरून घेण्यास चालना मिळाली, असे मोते यांनी सांगितले.

नोंदणीसाठी १३०० अर्जांवर कार्यवाही सुरू आहे. १०० अर्जांची नोंदणी पूर्ण झाली आहे. यासाठी प्रत्येक शेतकऱ्याला अवघे दहा रुपये शुल्क भरावे लागले. आता आयुक्तांनी या प्रक्रियेत लक्ष घातल्याने नोंदणीसाठी प्रत्येक जिल्ह्याला लक्ष्यांक ठरवून देण्यात आलेले आहेत. नोंदणीसाठी कार्यपद्धती व मार्गदर्शक सूचनादेखील देण्यात आलेल्या आहेत.

> **“ भौगोलिक मानाकनांचे वापरकर्ता शेतकरी होण्यासाठी खासगी संस्थांकडून तीन हजार रुपयांपर्यंत भरमसाट शुल्क घेतले जात होते. मात्र, कृषी विभागाने पुढाकार घेतल्याने आता केवळ दहा रुपयात नोंदणी होते आहे. शेतकऱ्यांना तालुका कृषी अधिकाऱ्यांकडे संपर्क साधून या नोंदणी मोहिमेत सहभागी होता येते.**
>
> **– गोविंद हांडे,** निर्यात सल्लागार, फलोत्पादन संचालनालय

भौगोलिक मानांकनानंतर ९० पिकांकरिता देशात आतापर्यंत ३००० शेतकऱ्यांनी अधिकृत वापरकर्ता म्हणून केली. महाराष्ट्रात यातील २० फळे व भाजीपाला पिकासाठी मानांकन असून वापरकर्ता शेतकरी म्हणून २७३५ जणांची नोंदणी केली आहे. त्यात कोकण हापूस ९५३, सोलापूर डाळिंब ८४६, सांगली बेदाणा १८६, आजरा घनसाळ ११८, वेंगुर्ला काजू ११८, जळगाव केळी १०२, वाघ्या घेवडा ८९, घोळवड चिकू ७६, नवापूर तूरडाळ ६१, रत्नागिरी कोकम ३८, मंगळवेढा ज्वारी २५, वायगाव हळद २० तर जळगाव भरीत वांगे एका शेतकऱ्याची नोंदणी झाली आहे.

माहे ऑक्टोबर २०२१.

# महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळाच्या शेतमाल तारण कर्ज योजनेचा शेतकऱ्यांनी लाभ घ्यावा-दिनेश पाटील

चाळीसगांव :- महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळामार्फत १९९० पासून शेतमाल तारण कर्ज योजना राबविण्यात येत आहे. ही योजना उत्पादक शेतकऱ्यांच्या हिताची आणि फायद्याची असल्याने योजनेला कृषी उत्पन्न बाजार समित्या व शेतकरी यांच्याकडून चांगला प्रतिसाद मिळाला आहे व मिळत आहे.

सन २०२०-२०२१ चे खरीप काढणी हंगामानंतर शेतमालाचे भाव मोठ्या प्रमाणावर वाढल्याने ज्या शेतकऱ्यांनी सोयाबीन सारख्या शेतमालाची साठवणूक करुन ठेवली होती त्यांना प्रति क्विंटल ३००० ते ३५०० इतका जादाचा बाजारभाव मिळाला आहे. या गोष्टीच्या पार्श्वभूमीवर व ही योजना शेतकऱ्यांच्या फायद्याची आणि लाभाची असल्याने सदरची योजना २०२१-२०२२ या हंगामात चाळीसगांव कृषी उत्पन्न बाजार समितीच्या माध्यमातून राबविण्यात येत आहे.

या योजनेअंतर्गत चाळीसगांव कृषी उत्पन्न बाजार समिती शेतमाल तारण कर्ज योजना राबविण्यासाठी आवश्यक त्या सुविधा मार्केट कमिटीच्या प्रांगणात शेतकऱ्यांसाठी उपलब्ध करुन देणार आहे. शेतकऱ्यांनी आपल्या मालाची साठवणूक मार्केट कमिटीच्या परिसरातील गोदामामध्ये केली तर शेतकऱ्यांना त्यांनी गोडावूनमध्ये साठवून ठेवलेल्या शेतमालावर तारण कर्ज देखील दिले जाणार आहे.प्रामुख्याने तुर,मुग, उडीद, सोयाबीन, सुर्यफुल, चना, भात (धान), करडई,वाघ्या घेवडा (राजमा), ज्वारी, बाजरी, मका, गहु, हळद, काजु बी, बेदाणा व सुपारी या शेतमालावर शेतकऱ्यांना तारण कर्ज दिले जाते. या योजनेमुळे शेतकऱ्यांचा उत्पादीत माल आधारभुत किंमतीपेक्षा कमी भावाने विक्री होत नाही. शिवाय शेतकऱ्यांना तारण कर्ज योजनेचाही लाभ होतो आणि म्हणून तालुक्यातल्या सर्व शेतकऱ्यांनी या योजनेचा लाभ घेण्याचे आवाहन चाळीसगांव कृषी उत्पन्न बाजार समितीचे मुख्य प्रशासक दिनेश पाटील व प्रशासकीय मंडळाने केले आहे. या योजनेच्या अधिक माहितीसाठी शेतकऱ्यांनी बाजार समितीचे सचिवांना भेटण्याचे आवाहनही दिनेश पाटील यांनी केले आहे. या योजनेअंतर्गत फक्त उत्पादक शेतकऱ्यांचा शेतीमाल स्विकारला जातो. शेती मालाच्या एकूण किंमतीच्या ७५ टक्केपर्यंतचे कर्ज वार्षिक ६% व्याजदराने योजनेस सुरुवात केल्याच्या तारखेपासून ६ महिन्याचे (१८० दिवस) मुदतीकरीता अदा करण्यात येते. प्रत्यक्षात तारण ठेवलेल्या शेतमालाची किंमत तत्कालिन बाजारभाव किंवा शासनाने जाहीर केलेल्या आधारभुत किंमत यापैकी जी कमी असेल त्यापैकी ठरविण्यात येते.

दै. देशोन्नती [illegible] ऑक्टोबर २०२१.

# शेतमाल तारण कर्ज योजना शेतकऱ्यांच्या हिताची : पाटील

## चाळीसगावं कृषी उत्पन्न बाजार समितीकडून आवश्यक सुविधा मिळवूनं देण्याचे आवाहन

देशोन्नती वृत्तसंकलन...

**चाळीसगाव ■** राज्य कृषी पणन मंडळामार्फत १९९० पासून शेतमाल तारण कर्ज योजना राबविण्यात येत आहे. ही योजना उत्पादक शेतकऱ्यांच्या हिताची आणि फायद्याची आहे. या योजनेला कृषी उत्पन्न बाजार समित्या व शेतकरी यांच्याकडून चांगला प्रतिसाद मिळत असून जास्तीत जास्त लाभ घ्या, असे आवाहन येथील कृषी उत्पन्न बाजार समितीचे मुख्य प्रशासक दिनेश पाटील व प्रशासकीय मंडळाने केले आहे.

सन २०२०-२०२१ चे खरीप काढणी हंगामानंतर शेतमालाचे भाव मोठया प्रमाणावर वाढल्याने ज्या शेतकऱ्यांनी सोयाबीन सारख्या शेतमालाची साठवणूक करून ठेवली होती त्यांना प्रति क्विंटल ३००० ते ३५०० इतका जादाचा बाजारभाव मिळाला आहे. या गोष्टीच्या पार्श्वभूमीवर व ही योजना शेतकरयाच्या फायद्याची आणि लाभाची आहे. ही योजना २०२१-२२ या हंगामात चाळीसगाव कृषी उत्पन्न बाजार समितीच्या माध्यमातून राबविण्यात येत आहे.

या योजनेअंतर्गत चाळीसगाव कृषी उत्पन्न बाजार समिती शेतमाल तारण कर्ज योजना राबविण्यासाठी आवश्यक त्या सुविधा मार्केट कमिटीच्या जागेत शेतकऱ्यांसाठी उपलब्ध करून देणार आहे. शेतकऱ्यांनी आपल्या मालाची साठवणूक मार्केट कमिटीच्या परिसरातील गोदामामध्ये केली तर शेतकऱ्यांना त्यांनी गोडावूनमध्ये साठवून ठेवलेल्या शेतमालावर तारण कर्ज देखील दिले



जाणार आहे. प्रामुख्याने तूर, मूग, उडीद, सोयाबीन, सूर्यफुल, चना, मात (धान), करडई वाघ्या घेवडा (राजमा), ज्वारी, बाजरी मका, गहु, हळद, काजु बी, बेदाणा व सुपारी या शेतमालावर शेतकऱ्यांना तारण कर्ज दिल जाते. या योजनेमुळे शेतकऱ्यांचा उत्पादीत माल आधारभुत किंमतीपेक्षा कमी भावाने विक्री होत नाही. शिवाय शेतकऱ्यांना तारण कर्ज योजनेचाही लाभ होतो आणि म्हणून तालुक्यातल्या सर्व शेतकऱ्यांनी या योजनेचा लाभ घेण्याचे आवाहन चाळीसगांव कृषी उत्पन्न बाजार समितीचे मुख्य प्रशासक दिनेश पाटील व प्रशासकीय मंडळाने केले आहे. या योजनेच्या अधिक माहीतीसाठी शेतकऱ्यांनी बाजार समितीचे सचिवांना भेटण्याचे आवाहनही दिनेश पाटील यांनी केले आहे. या योजनेअंतर्गत फक्त उत्पादक शेतकऱ्यांचा शेतीमाल स्विकारला जातो. शेती मालाच्या एकूण किंमतीच्या ७५ टक्केपर्यंतचे कर्ज वार्षिक ६ टक्के व्याजदराने योजनेस सुरवात केल्याच्या तारखेपासून ६ महिन्याचे (१८० दिवस) मुदतीकरीता अदा करण्यात येते. प्रत्यक्षात तारण ठेवलेल्या शेतमालाची किंमत तत्कालिन बाजारभाव किंवा शासनाने जाहीर केलेल्यां आधारभुत किंमत यापैकी जी कमी असल त्यापैकी ठरविण्यात येते. शेतकरी बंधू आपला शेतमाल वेअरहाऊसच्या गोडावून मध्ये ठेवू शकता वेअरहाऊसच्या पावती वर देखील शेतमाल तारण कर्ज योजना चा लाभ घेता येईल. वेअरहाऊस गोडावून भाडे बाजार समिती भरेल. जास्तीत जास्त शेतकरी बधूंनी या योजनेचा लाभ घ्यावा, असे आवाहन केले आहे.